| | दुरध्वनी क्रमांक (07132) 222347 | जिल्हा परिषद, गडचिरोली<br>शिक्षण विभाग (प्राथमिक)<br>Email :- eoprygadchiroli@gmail.com |
|---|---|---|
| शिक्षण वि(प्रा.) | जा.क्र./जिपग/शिवि/खाप्राशा/3018 /2026, | दिनांक :- 14/05 /2026 |

**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, ऑक्टोंबर 11, 2011/आश्विन 19, शके 1933**

**नमुना दोन**

**प्रती,**

**मुख्याध्यापक,**
**कारमेल अकॅडेमी, आमगाव**
**ता. देसाईगंज जि. गडचिरोली.**

**मार्फत :- गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, देसाईगंज**

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 मधील कलम 18 च्या प्रयोजनार्थ बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 मधील नियम 11, पोट-नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ** :- आपले प्रस्ताव पत्र जा.क्र./308/2026 दिनांक - 09.04.2026

उपरोक्त संदर्भिय अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्र व्यवहार/शाळेची केलेली तपासणी अहवालाच्या आधारे **मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली दिनांक 02.04.2022 ते 01.04.2025 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ली ते 8 वी करीता कारमेल अकॅडेमी, आमगाव ता. देसाईगंज जि. गडचिरोली** या शाळेस याद्वारे तात्पूरती मान्यता देत आहे. सदर मान्यता ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रदान करण्यात येत आहे.

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता 8 वी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे, शाळा पालन करील.
2. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व माध्यमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
3. परिच्छेद-3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
4. संस्था/शाळा कोणतीही कंपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता/पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
5. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या व्यतीरिक्त धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
6. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

   **(दोन)** कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

   **(तिन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

   **(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

   **(पाच)** विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतूदी नुसार समावेश करण्यात येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)** अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

**(आठ)** शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

7. शाळा समुचीत प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.
8. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्या प्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तूलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
9. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकाचे पालन करील, आपण सादर केलेल्या प्रस्तावानुसार मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे :-
   - शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- 55440 .00 चौ. मी.
   - एकूण बांधकाम क्षेत्र :- 200 .38 चौ. मी.
   - खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- 18787 .00 चौ. मी.
   - वर्ग खोल्यांची संख्या :- 18
   - कार्यालय-नि -भांडार -नि- मुख्याध्यापकाची खोली :- 02
   - मुलांसाठी व मुलीं साठी स्वतंत्र प्रसाधन गृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. :- **होय**
   - पिण्याच्या पाण्याची सुविधा :- **आहे**
   - दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर :- **लागू नाही**
   - अध्यापन, अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडा विषयक सामग्री/ ग्रंथालय याची उपलब्धता :- **आहे**
   - वाचन साहित्य विनासायास उपलब्ध :- **आहे**
10. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.
11. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
12. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
13. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
14. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखा परिक्षीत व प्रमाणीत करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कडे पाठविण्यात यावी.
15. तुमच्या शाळेला मिळालेली मान्यता संकेतांक 27121203104 असा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.
16. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रूटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.
17. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही काम असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.
18. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, गडचिराली**